नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०७/२०२५ (शुक्रवार)**

---

## श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथील बंदोबस्ताला मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट,

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान, धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक १२/०७/२०२५ रोजी पर्यंत यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानिमित्याने तेथे बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी आषाढी प्रतिपदा असल्याने विठ्ठल रूक्मिणी देवस्थान धापेवाडा येथे मुख्य यात्रा असुन मुख्य यात्रेत भाविकांची मोठया प्रमाणत गर्दी असते. आज रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान,धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे भेट दिली. श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट चे पदाधिकारी यांनी मा. पोलीस अधिक्षक आणि अपर पोलीस अधिक्षक यांना शाल आणि श्रीफळ देवुन त्यांचा सन्मान केला. सदर वेळी देवस्थान ट्रस्ट चे इतर पदाधिकारीचे सुध्दा हजर होते. तसेच मा. पोलीस अधिक्षक आणि अपर पोलीस अधिक्षकांनी बंदोबस्ताची पाहणी करून **बंदोबस्तात हजर असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना सतर्कतेने बंदोबस्त पार पाडण्याबाबत सुचना दिल्या आहे.**





# पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत वाघोली येथे वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद, एका पिडीतेची सुटका, दोन आरोपी ताब्यात

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक ११/०७/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, कन्हान ते नागपुर रोड वरील मौजा वाघोली येथील मान हॉटेल येथे महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करून घेत आहे. सदर माहीती वरून पोलीसांनी मौजा वाघोली येथील मान हॉटेल येथे धाड टाकली असता **आरोपी नामे— १) दिलीप शालीकरामजी राउत, वय ४९ वर्ष, रा. अर्शिवाद मंगल कार्यालया सामोर, कांद्री ता. पारशिवणी हा मान हॉटेल बाहेर मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता तो महीलांना देहव्यापर करण्यासाठी** मान हॉटेल येथे घेवुन येत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **तसेच हॉटेल मध्ये जावुन पाहणी केली असता हॉटेल मालक आरोपी क्र २) रविंद्र रामजनम यादव, वय ४४ वर्षे,रा वाघोली ता. पारशिणी हा हॉटेल चे काउंटरवर बसुन मिळुन आला.** पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेलची झडती घेतली असता नमुद हॉटेल मध्ये खोली क्रं १०४ मध्ये एक पिडीत महीला मिळुन आली. दोन्ही आरोपी हे स्वतःच्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली . पोलीसांनी घटनास्थळावरून ३ ॲड्रॉईड मोबाईलसह , रोख रक्कम १०,००० /— रूपये, डि.व्ही.आर आणि इतर साहीत्य असा ६०,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच नमुद मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे.

**नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १०/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ११/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत पवनी, देवलापार येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. देवलापार येथे नाकाबंदी करण्यात आली. पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत रामटेक टाऊन, मनसर आणि नगरधन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. बस स्टॅड रामटेक जवळ नाकाबंदी करण्यात आली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच हॉटेल लॉजेस ची तपासणी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. मो.वा.अधिनियम अन्वये १५ कारवाई करण्यात आल्या. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते. तसेच रात्र गस्त दरम्यान श्री रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनात देवालापार पोलीसांनी मौजा कट्टा ता. रामटेक येथुन आरोपी च्या घरून १० लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू असा मुद्देमाल जप्त करून म.दा.का प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.








## प्राणांतिक अपघात

पोस्टे कोंढाळी अंतर्गत मौजा वर्धा रोडवरील हिवसन मंदीराजवळ दिनांक १०/०७/२०२५ चे १७/०० वाजेच्या सुमारास यातील फिर्यादी नामे निलेश राजु परतेकी, वय ४० वर्षे, रा. दहेगाव गोंडी ता. आर्वी **यांचा मुलगा मृतक नामे— पियुष निलेश परतेकी, वय १२ वर्ष** हा रस्ता ओलांडत असताना वर्धा रोडवरून येणाऱ्या पीकअप क्रमांक एम.एच. ४० सी.डी २३२८ चा चालक आरोपी नामे **महेश अशोकराव किनकर रा. खापरी बारोकर** याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादी यांचे मुलाला धडक मारली त्यामुळे तो जखमी झाला. त्याला उपचाराकामी प्राथमिक उपचार केंद्र, कोंढाळी येथे नेले असता वैदयकीय अधिकारी यांनी फिर्यादी यांचे मुलाला मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कोंढाळी येथे पीकअप क्र एम.एच. ४० सी. डी २३२८ चा चालक आरोपी नामे महेश अशोकराव किनकर, रा. खापरी बारोकर याचे विरूद्ध

कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं २०२३ सहकलम १८४ मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**